## <u>वि. दि. दावा क्र. ७/२०१८ मधील नि. क्र. ३९ खालील आदेश</u>

<u>CNR : MHSN05-000008-2018</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने त्याच्याविरुद्ध झालेला विना कैफियत चौकशीचा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे म्हणणे असे की, प्रतिवादीने वेळेत कैफियत दिली नाही. त्यामुळे त्याच्याविरुद्ध विना कैफियत चौकशीचा आदेश पारित झाला आहे. प्रतिवादीला कायद्याचे ज्ञान नाही, तसेच प्रतिवादी आजारी होता, त्याला डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिलेला होता, त्यामुळेही प्रतिवादीला वेळेत कैफियत देता आली नाही. शिवाय प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता (येथून पुढे सोयीसाठी ''दि.प्र.सं.'' असा उल्लेख केला आहे) आदेश ७ नियम ११ प्रमाणे दिलेला अर्ज न्यायालयासमोर प्रलंबीत होता. त्यामुळेही प्रतिवादीने आपली कैफियत वेळेत दिली नाही. प्रतिवादी व्यवसायिक असल्यामुळे त्याला सातत्याने बाहेरगावी जावे लागते. प्रतिवादीचे वकील कोल्हापूरचे आहेत. प्रतिवादीच्या वकीलांनी स्थानिक वकीलांना सुचना देवूनही त्यांनी मुदतीचा अर्ज दिला नाही. त्यामुळे प्रतिवादीविरुद्ध विना कैफियत चौकशीचा आदेश पारित झाला आहे. प्रतिवादी कैफियत देवून दाव्यास विरोध करु इच्छितो. त्याला संधी मिळणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

३. वादीने अर्जास विरोध करुन त्याचे म्हणणे निशाणी ४१ ला दिले आहे. वादीचे म्हणणे असे की, प्रतिवादी या कामी हजर झालेला असतानाही त्याने वेगवेगळ्या प्रकारचे अर्ज देवून जाणीवपुर्वक कैफियत दिलेली नाही. प्रतिवादीने आजारी असल्याचे अर्जात नमुद केलेले कारण चुकीचे आहे. आजारपणाबाबतचा कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. अर्जात नमुद केलेली कारणे योग्य व पुरेशी नाहीत. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा. यदाकदाचित अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास रुपये ५,०००/– खर्च मिळावा.

४.		दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५.		वादीच्या वकीलांनी जरीही वरीलप्रमाणे हरकती घेतल्या असल्या तरी, प्रतिवादीच्या वकीलांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे, प्रतिवादीने दि.प्र.सं. आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दिलेला होता, तो अर्ज न्यायालयाने गुणदोषावर दि. १६.०१.२०१९ रोजी नामंजूर केला असल्याचे अभिलेखावरुन दिसून येते हे बरोबर आहे. शिवाय अभिलेखावरुन असेही दिसून येते की, प्रतिवादीविरुद्ध विना कैफियत चौकशीचा आदेश दि. ०७.०२.२०१८ रोजी झालेला आहे. असे असले तरी, प्रतिवादीच्या वकीलांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे, प्रतिवादीने दि.प्र.सं. आदेश ७ नियम ११ चा अर्ज दिलेला असल्यामुळे त्या अर्जाचा निकाल होईपर्यंत प्रतिवादीने कैफियत दिली नाही, म्हणून त्याच्याविरुद्ध झालेला आदेश रद्द न केल्यास प्रतिवादीला त्याची बाजू मांडण्याची संधी मिळणार नाही. एकदा दि.प्र.सं. आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दिल्यानंतर त्याचा निकाल होईपर्यंत प्रतिवादीला कैफियत देण्याचे प्रयोजन उरणार नाही. त्यामुळे प्रतिवादीने दि.प्र.सं. आदेश ७ नियम ११ प्रमाणे दिलेल्या अर्जाचा निकाल होईपर्यंत कैफियत नाही म्हणून त्याने जाणीवपुर्वक विलंब केलेला आहे असे म्हणता येणार नाही.

६.		वादीच्या वकीलांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे, अर्जामध्ये प्रतिवादीने आजारपणाचे कारण नमुद केलेले आहे, त्याबाबत कागदोपत्री पुरावा जोडलेला नाही, तसेच अर्जात नमुद केलेली कारणे परस्परविरोधी आहेत असे दिसते, हे बरोबर आहे. परंतु प्रतिवादीच्या वकीलांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे, वादीने प्रस्तुतचा दावा खरेदीपत्र रद्दबातल आहे असे जाहीर हक्कज्ञापन होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. दावा मिळकतीचे प्रतिवादीच्या नावे झालेले खरेदीपत्र नोंदणीकृत आहे. अशा परिस्थितीमध्ये दावा मिळकतीच्या मालकीबाबतचे हक्क, अधिकार गुणदोषावर निकाली काढण्यासाठी प्रतिवादीला त्याची बाजू मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे.

७.	वादीने जरीही खर्च मागितला असला तरी, दि.प्र.सं. आदेश ७ नियम ११ चा अर्ज निकाली काढल्यानंतर वादीने दावा दुरुस्तीचा आर्ज दिला असल्याचे दिसते. त्यानंतर प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. याचा विचार करता प्रतिवादीच्याविरुद्ध खर्चाचा आदेश पारित करणे उचित होणार नाही.

८.	वरील विवेचनावरुन अर्ज मंजूर करावा लागेल. म्हणून पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## **आदेश**

अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

प्रतिवादीविरुद्ध झालेला विना कैफियत चौकशीचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

सही/-

इस्लामपूर
(श्रीमती सु. रा. पाटील)

दिनांक-२५.०४.२०१९
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर